INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या संदर्भात सुशासन आणि नेतृत्व

## (Good Governance and Leadership in the context of Kautilya's Economics)

**दर्शना अशोक देशमुख**
सहाय्यक प्राध्यापिका,
सेठ हिराचंद मुथा कॉलेज,
कल्याण (प.) (महाराष्ट्र, भारत)
E-mail: darshanadeshmukh21@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/10.2025-82815922/IRJHISNC2503016**

**सारांश :**

*इ.स.पूर्व चौथ्या शतकात चंद्रगुप्त मौर्याचा महामात्य 'अर्थशास्त्र' ग्रंथाचा कर्ता 'कौटिल्य' हा विष्णुगुप्त आणि चाणक्य या नावांनीही प्राचीन भारतीय इतिहास, राजनीति आणि संस्कृतीविषयक वाङ्मयात प्रसिद्ध आहे. त्यांच्या शिकवणीचा खजिना त्यांच्या अर्थशास्त्र या ग्रंथात सापडतो, जो आदर्श नेतृत्वावर आधारित सुशासनाशी संबंधित आहे. शतकानुशतके, भारतीय राज्यकर्त्यांनी ही संकल्पना यशस्वी सरकारचे मॉडेल म्हणून वापरली आहे. राजाने आपल्या प्रजेचे पालन व राज्याचे संरक्षण व त्याचा विस्तार कसा करावा, मंत्र्यांची नेमणूक व त्यांच्याशी सल्लामसलत, विविध प्रकारची खाती व त्यांची कार्यपद्धती, न्यायदान व कायदा, गुन्ह्यांचा शोध व गुन्हेगारांचा बंदोबस्त करणे, शत्रू, मित्र व इतर राष्ट्रांशी परिस्थितीला योग्य ठरतील असे ठेवायचे निरनिराळ्या प्रकारचे संबंध, राज्याच्या विस्तारासाठी आवश्यक होणाऱ्या मोहिमा व युद्धे इत्यादी सर्व विषयासंदर्भात माहिती दिली. भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये (Indian knowledge system) रुजलेले अर्थशास्त्र राज्य आणि तेथील नागरिकांच्या कल्याणावर लक्ष केंद्रित करून, शासनासाठी व्यावहारिक आणि नैतिकदृष्ट्या पायाभूत दृष्टिकोनाची रूपरेषा देते. कूटनीति, आर्थिक व्यवस्थापन आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा मेळ घालून नेतृत्वाचा बहुआयामी दृष्टिकोन मांडतो. शासक किंवा नेत्याने बुद्धी, आत्म-नियंत्रण आणि नैतिक सचोटी या गुणांना मूर्त रूप देणे, निर्णय घेण्यामध्ये दूरदृष्टी दाखवणे आणि राज्याची समृद्धी आणि स्थिरता सुनिश्चित करणे अपेक्षित आहे. भारतीय ज्ञानप्रणालीतून उद्भवलेल्या या तत्त्वज्ञानाचा आधुनिक काळातील राजकारण आणि नेतृत्वातील मुद्द्यांशीएक अनोखा आणि प्रभावी संबंध आहे. कौटिल्याने मांडलेले सुशासनाचे तत्त्वज्ञान म्हणजे सुशासन, नेतृत्व, कायदा, नैतिकता, लोककल्याण, आणि आर्थिक शिस्त यांचा संगम आहे. याद्वारे कौटिल्याच्या तत्त्वज्ञानाचा आढावा घेत, ते आजच्या काळात कसे लागू करता येईल, यावर प्रकाश टाकता येईल.*

***मूळ शब्द :** कौटिल्य, अर्थशास्त्र, भारतीय ज्ञान प्रणाली, सुशासन, नेतृत्व, सामाजिक कल्याण.*

**प्रस्तावना :**

सुशासन आणि प्रभावी नेतृत्व हे कोणत्याही राष्ट्राच्या विकासाच्या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. भारताच्या प्राचीन इतिहासात कौटिल्य (चाणक्य) यांनी "अर्थशास्त्र" या ग्रंथात याबाबत सखोल मार्गदर्शन केले आहे. कौटिल्याचे अर्थशास्त्र हे केवळ आर्थिक

किंवा प्रशासनिक धोरणांवर आधारित नसून, ते शासनाच्या सर्वांगीण व्यवस्थापनाची मूलभूत तत्त्वे मांडणारे आहे. त्यांनी सुशासनासाठी शासकाचे नैतिकतेवर आधारित मजबूत नेतृत्व आवश्यक असल्याचे सांगितले आहे. कौटिल्य यांच्या कौटिलीय अर्थशास्त्र ग्रंथावरून एक गोष्ट चटकन लक्षात येते ती ही की, ह्या शास्त्रात राज्यकारभाराच्या तपशिलावरच सर्वस्वी भर दिला आहे. राज्यसंस्थेचे उद्दिष्ट काय, विविध प्रकारच्या राज्यपद्धती व त्यांचे गुणावगुण, प्रजेचे राज्यातील स्थान इत्यादी तात्विक विषयांची चर्चा अशी केलेली त्यात आढळत नाही. व्यक्ती व राज्यसंस्था यांच्या परस्परसंबंधाची चर्चाही या शास्त्रात केलेली नाही. त्याचे कारण उघड आहे उभयतांची कर्तव्ये पुरातन काळापासून ठरवून दिलेली आहेत. वर्णाश्रमधर्मानुसार प्रत्येक व्यक्तीचा स्वधर्म निर्धारित झालेला असल्यामुळे त्याचा राज्यसंस्थेशी संबंध त्या स्वधर्माच्या संदर्भातच येणे संभाव्य होते. त्याचप्रमाणे राजाचे कर्तव्य किंवा त्यांचा स्वधर्म हा ठरून दिला होता. राज्यसंस्थेच्या उत्पत्ती विषयी काही विचार एके ठिकाणी आढळतात.

भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये, सुशासन हे फक्त आर्थिक विकासासाठीच नाही तर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक मानले जाते. अर्थशास्त्र सुशासनाचे विविध पैलू मांडते, जसे की राजाचे कर्तव्य, न्यायप्रणाली, धोरणांची आखणी, आणि समाजातील प्रत्येक घटकासाठी उचित व्यवस्थापन. नेतृत्वाच्या संदर्भात, कौटिल्याचे विचार नेता कसा असावा, त्याचे कर्तव्य काय असावे, त्याच्या धोरणांमध्ये नैतिकता आणि समर्पण कसे असावे याबद्दल मार्गदर्शन करतात. भारतीय ज्ञान प्रणालीच्या संदर्भात या ग्रंथाने आदर्श प्रशासन आणि शासन यासंबंधीचे नियम आखून दिले आहेत, जे आजच्या आधुनिक शासन पद्धतीशी सुसंगत असतात. सुशासन म्हणजे सर्वसमावेशक आणि न्यायिक दृष्टिकोनातून लोककल्याणकारी राज्य हे कौटिल्याच्या तत्त्वज्ञानाचे मुख्य सूत्र आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1) आधुनिक व्यवस्थापन परिस्थितीत अर्थशास्त्रात नमूद केल्याप्रमाणे शासनाच्या भूमिकेचे तुलनात्मक विश्लेषण करणे.

2) नेतृत्वाने राज्य आणि समाजाची कशी प्रगती होते याचे विश्लेषण करणे.

3) सुशासनाच्या तत्त्वांचा आधुनिक काळात कसा वापर केला जाऊ शकतो याचा अभ्यास करणे.

4) कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या संदर्भात भारतीय ज्ञानप्रणालीतील सुशासन आणि नेतृत्व या दोन घटकांचा सखोल अभ्यास करण्यास मदत करणे.

**संशोधन पद्धती :**

दुय्यमस्त्रोतांवर आधारित.

**तथ्य विश्लेषण :**

"यत्र विश्वम् भवति एक नीडम्।" अर्थात जेथे संपूर्णजग हे एका घरट्याप्रमाणे आहे, आपण सर्व एक आहोत असा महान संदेश देणारी, केवळ मानवालाच नाही तर प्रत्येक सजीवाला महत्वाचे स्थान देणारी अशी ही भारतीय संस्कृती. प्राचीन भारतीय ज्ञान हे सर्वात जुन्या आणि समृद्ध परंपरांपैकी एक आहे. वेद, उपनिषदे, पुराणे व इतर ग्रंथांतूनतत्त्वज्ञान, गणित, आयुर्वेद, विज्ञान, योग यासारख्या अनेक विषयांचे सखोल ज्ञान मांडले गेले. प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीने सर्व मानवांच्या विकासावर भर दिला. आजही या ज्ञानाचा वापर आधुनिक काळात प्रेरणा व मार्गदर्शन म्हणून केला जात आहे.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रात प्रशासनातील सातत्य, योग्य नियोजन, नीती आणि व्यवस्थापन यावर भर देण्यात आला आहे.

कौटिल्याने आदर्श शासक कसा असावा याचे वर्णन केले आहे आणि या विचारांचा आधुनिक काळात सरकारमध्ये आणि नेतृत्वात मोठा प्रभाव आहे. त्याने सांगितलेले 'सप्तांग सिद्धांत' (राज्याचे सात अंग) म्हणजे राजा, मंत्री, जनतेचे कल्याण, सैन्य, अर्थव्यवस्था, परराष्ट्र धोरण आणि कायदा व्यवस्था हे आजच्या शासकीय यंत्रणांसाठी मार्गदर्शक ठरू शकतात.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रात सरकारकडे सोपविण्यात आलेली कार्ये विचारात घेतली ते त्या माध्यमातून कल्याणकारी राज्य संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचा सरकारने प्रयत्न करावा अशी त्यांची भूमिका होती.

**विकासात्मक कामे** –

राज्याची आर्थिक प्रगती करणे हे शासनाचे प्रमुख कार्य आहे. त्यामध्ये शासनाने पडीक जमीन लागवडीखाली आणणे, जलसिंचनाचे तलाव बांधावे, खाणीतून खनिजे बाहेर काढावीत, उद्योग व व्यापाराला प्रोत्साहन द्यावे, यामुळे राष्ट्राची आर्थिक प्रगती होईल. तसेच काही उद्योग शासकीय मालकीचे तर काही उद्योग खाजगी मालकीचे असावे असे सांगितले. वस्त्रोद्योग, पशुपालन, हस्तव्यवसाय खाजगी क्षेत्राकडे असावा. शासनाने देशातील उत्पादन विभाजन, विनिमय आणि उपभोग ही कार्ये अपेक्षित नियमाप्रमाणे चालतात किंवा नाही याकडे लक्ष ठेवावे त्यातून राज्यातील एकूण आर्थिक व्यवहार लोकांच्या कल्याणासाठी केला जाऊ शकेल.

**नियंत्रणात्मक कामे** –

कौटिल्य यांच्या मते, वेगवेगळ्या वस्तूंच्या किंमतीवर नियंत्रणे असावीत त्यामुळे व्यापारी वर्गाकडून ग्राहकांची पिळवणूक होणार नाही. चंद्रगुप्ताच्या राज्यात वाणिज्य अधिक्षकाद्वारे किमती नियंत्रीत केल्या जात असत. सामान्यपणे जीवनावश्यक अन्यधान्याचा व्यापार सरकारमान्य व्यापाऱ्यांकडून होत असे. व्यापाऱ्यांना परदेशी वस्तूंवर 10 टक्के आणि 8 टक्के नफा घेण्याची परवानगी होती. जे व्यापारी राज्यांची किंवा वाणिज्य अधीक्षकांनी ठरवून दिलेल्या किंमतीपेक्षा जास्त वस्तूंची विक्री करेल त्या व्यापाऱ्याला दंड करावा, कडक शासन करावे. एवढेच नव्हे, सरकारने त्या स्वतःच योग्य किंमतीला खरेदी कराव्यात असा विचार मांडला. व्यापारी लोक योग्य वजनाचा वापर करतात किंवा नाही हे ठरविण्यासाठी सरकारने वजने मापे प्रमाणित करणारे शिक्के तयार करावेत असेही सुचविले.

**सामाजिक सुरक्षितता आणि कल्याणकारी राज्य** –

कौटिल्याचे अर्थशास्त्रीय विचार, धर्म, न्याय आणि नीतिशास्त्र यावर आधारित होता. त्याच्या विचारसरणीत जनकल्याण आणि सामाजिक सुरक्षिततेचे विचार आढळतात. त्यांच्या काळात सामाजिक सुरक्षितता योजना अस्तित्वात नव्हती. मात्र त्याचे विचार, आचार, सामाजिक कल्याण कल्पनेशी जवळीक साधणारे आहेत.

कौटिल्याच्या मते राज्यातील अनाथ, वृद्ध, विधवा, अपंग इत्यादींना आधार नसलेल्याचे पालन राजाने करावे. गरिबांच्यासाठी हित धर्मार्थ संस्था स्थापन कराव्यात, बेकारांना काम द्यावे. रोग्यासाठी औषधपाण्याची सोय करावी. प्रवाशांसाठी विश्रामगृह बांधावीत, गरिबांना अन्नदान करावे. प्रशासनाचा मुख्य उद्देश संपत्ती व अन्नधान्य यांचे समान वितरण हा असला पाहिजे. तत्कालीन औद्योगिक क्षेत्रात वर्ग संघर्ष होत नव्हता. साठेबाजी, वस्तूतील भेसळ, कामगारांचे शोषण आणि कुळांची पिळवणूक कडक कायदे केले पाहिजेत. थोडक्यात राजा प्रजेचे पालन करणारा असावा. नैसर्गिक आपत्ती म्हणजे दुष्काळात किंवा अतिवृष्टीत शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यास शासनाने मदत करावी. पीडितांना मोफत बी - बियाणे खते द्यावीत.

थोडक्यात सामाजिक सुरक्षितता आणि कल्याणकारी राज्य व्यवस्थेचे आजच्या कल्याणकारी राज्य व्यवस्थेची मिळते जुळते आहे.

कौटिल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथामध्ये प्रशासन, नेतृत्व आणि राज्यकारभाराच्या सिद्धांतांचा सखोल अभ्यास केला आहे. या प्राचीन ग्रंथातील मार्गदर्शन आजच्या आधुनिक भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये देखील महत्त्वपूर्ण आहे, कारण यातील शासकीय नीती, आर्थिक प्रशासन, आणि राजकीय नेतृत्वाचे विचार आजही उपयुक्त ठरतात. कौटिल्य यांनी सुशासनाच्या (Good Governance) संदर्भात मांडलेले नियम आणि मार्गदर्शन आजच्या 21 व्या शतकातही प्रभावी ठरतात. सुशासन हे सरकारच्या आणि राज्याच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी आवश्यक मानले जाते. आधुनिक युगात पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाचे तत्त्व हे महत्वाचे झाले आहे. हे तत्त्व नागरिकांना सरकारच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवण्यास मदत करते. लोकशाही व्यवस्थेत न्यायपूर्ण निर्णय लोकांचा विश्वास वाढवतो. कौटिल्य यांनी सरकारने मजबूत आर्थिक धोरणे असावी असे सांगितले आहे त्याचप्रमाणे आधुनिक काळातही आर्थिक स्थिरता आणि विकास यांवर सरकारची जबाबदारी अधिक आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून शासकीय प्रक्रियेतील वेग आणि कार्यक्षमता वाढवणे महत्त्वाचे आहे. आजच्या काळात राष्ट्रीय सुरक्षेचे तत्त्व हे त्यांच्याच शिकवणीवर आधारित आहे, तसेच नागरिकांचे कल्याण हे देखील महत्त्वाचे आहे. आजच्या काळात, नैसर्गिक संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन सुशासनाचे एक महत्वाचे अंग बनले आहे. प्रशासनातील पारदर्शकता, उत्तरदायित्व, सुरक्षा आणि आर्थिक स्थिरता या सर्व मुद्द्यांनाकौटिल्याचे अर्थशास्त्र मार्गदर्शन करते, ज्यामुळे आजच्या शासकीय व्यवस्थांवर त्याचा दीर्घकालीन प्रभाव पडत आहे.

त्याचप्रमाणे रिकामी झालेली तिजोरी भरताना किंवा आर्थिक संकट आली असता राजांनी मोठ्या आणि मध्यम उत्पन्नाच्या प्रदेशातील लोकांकडून कर घ्यावा तसेच कमी उत्पन्नाचे प्रदेश, सीमेवरील लहान प्रदेश ज्या प्रदेशांचा उपयोग किल्ले, पूल, पाटबंधारे बांधण्यासाठी होतो त्यांच्याकडून कराची मागणी करू नये या संदर्भात कौटिल्य यांनी सांगितलेल्या युक्त्या थक्क करणारे आहेत जसे देवालयातील द्रव्य अध्यक्षांनी ते जळून गेले असे खोटे सांगूनतिजोरी जमा करावे. एका रात्रीत मंदिर निर्माण करून लोकांकडूनपैसे घ्यावेत. लोकांना हेरांनी खोटी भिती आणि खोटे चमत्कार दाखवून पैसे वसूल करावेत. हेरांनी व्यापारी बनून मोठ्या व्यापाऱ्यांशी भागीदारी करून पैसे मिळवावेत. हे सर्व संकटकालीन उपाय आहेत. आणि या युक्त्या केवळ दुष्टआणि बदमाशांबरोबर वापरावयाच्या आहेत. हेच आताच्या आधुनिक भारतीय व्यवस्थेत काही ठिकाणी दिसून येते काही ठिकाणी दिसून येत नाही. एका कुशाग्र बुध्दीच्या व्यक्तीने राज्यकारभाराची अत्यंत व्यवहार्य, सर्व काळासाठी उपयुक्त सर्वांगीण राज्य मार्गदर्शिका तयार केली आहे.

तसेच भारतीय ज्ञान प्रणालीत कौटिल्याचे अर्थशास्त्र हा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ मानला जातो, ज्यात नेतृत्वाच्या विविध पैलूंवर सूक्ष्म आणि विस्तृत मार्गदर्शन दिले आहे. नेतृत्व म्हणजेच शासनकर्ता किंवा प्रशासक हा कसा असावा, त्याच्या कर्तव्यात काय असावे, याबाबत कौटिल्याने अनेक गोष्टी सांगितल्या आहेत. भारतीय पारंपरिक व्यवस्थेतील कौटिल्याच्या या विचारांना आजही महत्त्व दिले जाते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात नेतृत्वाचे काही प्रमुख तत्त्वे सांगितली.

**राज्याचे कल्याण हेच नेत्याचे सर्वोच्च ध्येय :**

शासकाचे ध्येय नेहमीच प्रजेचे कल्याण असले पाहिजे त्याने आपले वैयक्तिक हित बाजूला ठेवून राज्याच्या हिताला प्राधान्य दिले पाहिजे.

**नैतिकता आणि न्याय :**

कौटिल्याने नेत्यासाठी नैतिकतेवर भर दिला आहे. शासकाने नेहमी न्यायाधिष्ठित असावे आणि नैतिक तत्त्वांचे पालन करावे.

लोकांनी विश्वास ठेवण्यासाठी नेतृत्वाने न्यायपूर्ण वर्तणूक करणे गरजेचे आहे.

**दूरदृष्टी आणि धोरणात्मक विचार :**

कौटिल्याने सांगितले की एक उत्तम नेता तोच, जो भविष्यात येणाऱ्या अडचणींचा आधीच विचार करून निर्णय घेतो. शासकाने दूरदृष्टीनेविचार करून योग्य धोरणे आखणे आवश्यक आहे.

**व्यक्तिगत शिस्त :**

नेतृत्वात शिस्तीचे महत्त्व सांगितले आहे. कौटिल्याच्या मते, शासकाने स्वतःची जीवनशैली साधी ठेवावी आणि कोणत्याही प्रकारच्या भोगवादात गुंतूनये. एक शिस्तबद्ध नेतृत्वच आपल्या प्रजेसाठी प्रेरणादायक ठरू शकते.

**संकट व्यवस्थापन :**

नेतृत्वाचे एक महत्वाचे तत्त्व म्हणजे संकट काळात योग्य निर्णय घेण्याची क्षमता होय. कौटिल्याने शासकांना सांगितले की त्यांना आपल्या राज्यावर आलेल्या संकटांचायोग्य व्यवस्थापन करून जनतेला सुरक्षितठेवावे.

**परस्पर संबंधआणि मैत्री धोरण :**

शेजारील राष्ट्रांशी कसे संबंधठेवावे याबाबत कौटिल्याचे स्पष्ट मार्गदर्शन केले आहे. परराष्ट्र धोरण आणि राजनैतिक संबंधांचे व्यवस्थापन हे नेतृत्वाचे महत्त्वाचे गुण आहेत. शत्रूंपासूनसंरक्षण आणि मित्रांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे कौटिल्याच्या नेतृत्व तत्त्वज्ञानाचा एक भाग आहे.

**आर्थिक सृजाणपणा :**

नेतृत्वाने राज्याच्या आर्थिक संसाधनांचे सुयोग्य नियोजन आणि व्यवस्थापन करावे. त्याने कर प्रणालीतील पारदर्शकता, संसाधनांचीबचत, आणि कल्याणकारी योजना यांवर भर दिला आहे. कोणताही चांगला नेता राज्याच्या संपत्तीचा सुयोग्य वापर करतो.

**प्रशासनातील पारदर्शकता :**

कौटिल्यानी सांगितले की उत्तम शासकाने प्रशासनातील पारदर्शकता राखावी. प्रशासनातील भ्रष्टाचाराचे निर्मूलन करणे आणि लोकांच्या गरजा ओळखून शासन करणे हे उत्तम नेतृत्वाचे लक्षण आहे.

**गुप्तहेर प्रणाली आणि माहितीचे महत्त्व :**

कौटिल्याच्या मते, एक सक्षम नेतृत्व राज्यातील आणि बाहेरील स्थितीची माहिती गोळा करण्यासाठी गुप्तहेर यंत्रणा वापरते. योग्य निर्णय घेण्यासाठी माहितीवर आधारित रणनीती बनवणे आवश्यक आहे.

**शक्ती आणि शहाणपणाचा संतुलितवापर :**

शासकाने शक्तीचा वापर केवळ अत्यावश्यक परिस्थितीत करावा, परंतु सहसा शहाणपणाने वागावे, हिंसकपणा टाळून सहकार आणि शांततेच्या मार्गाने शासन करणे जास्त योग्य मानले गेले आहे.

कौटिल्याच्या या तत्त्वांवर आधारित नेतृत्व हे भारतीय ज्ञान प्रणालीच्या मूलगामी विचारांचे प्रतीक आहे. ते आजच्या काळातही मार्गदर्शक ठरते, जिथे शासक आणि नेत्यांना त्यांच्या कर्तव्यात पारदर्शकता, न्याय, नैतिकता, आणि जनकल्याणाचे तत्व पाळण्याचे मार्गदर्शन केले जाते. समाजाचे प्रशासन हे सरकार आणि न्यायिक लोकांद्वारे रोखलेल्या सार्वजनिक आणि न्यायिक प्रशासनाभोवती फिरते.

योग्य आणि न्याय्य प्रशासनाच्या कार्यासाठी कौटिल्य यांनी विविध घटकांवर चर्चा केली. मौर्य राजवंशाच्या काळात कल्याणकारी राज्य म्हणून काम करणाऱ्या या घटकांना एकमेव मान्यता मिळाली. काळाच्या गरजेनुसार ही संकल्पना विकसित झाली आहे. असे दिसून आले आहे की प्रशासनाचे घटक समान अस्तित्वात आहेत परंतु समाजात संकल्पना आणि मान्यता बदलल्याने आधुनिक प्रशासन हे राजेशाही स्वरूपाच्या जुन्या राजवंशाऐवजी लोकशाही संस्थेचा भाग आहे.

आजच्या काळातही, भारतीय ज्ञान प्रणाली आणि कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील शिकवणुक महत्वाची ठरते. चांगल्या नेतृत्वाच्या मूलभूत तत्त्वांचा अभ्यास करून शासनाने लोकांच्या कल्याणासाठी निर्णय घ्यावेत. शासनातील पारदर्शकता, जबाबदारीची भावना आणि योग्य धोरणे तयार करण्याची क्षमता हे प्रभावी नेतृत्वाचे गुण आहेत. त्यामुळे अर्थशास्त्रात मांडलेली तत्त्वे आजही उपयुक्त ठरतात, कारण त्यातून आपल्याला उत्तम राज्यकारभारासाठी मार्गदर्शन मिळते. म्हणजेच कौटिल्याचे अर्थशास्त्र हे सुशासन, उत्तम नेतृत्व, आणि लोककल्याणाचे महत्त्व पटवून देते, जे भारतीय ज्ञान परंपरेचा एक अभिन्न भाग आहे. जेव्हा आपण कौटिल्याने सांगितलेल्या एका चांगल्या नेत्याची गुणवैशिष्ट्ये पाहतो तेव्हा दिशा देणाऱ्या नेत्याच्या गुणांवरून त्याची अंमलबजावणी कशी केली जाते हे देखील स्पष्ट होते. कौटिल्याचा “जसा राजा, तशी प्रजा” यावर विश्वास होता. एक चांगला नेता तो असतो जो आपल्या लोकांचे आणि साम्राज्याचे (राज्य) हित वैयक्तिक हितापेक्षा वर ठेवतो. नेता आणि त्याचे अनुयायी यांच्यातील नातेसंबंध हे स्पष्टपणे स्पष्ट करते. परिवर्तनवादी नेत्याचे गुण दर्शवून, कौटिल्य म्हणतात, “एक आदर्श राजा (शासक) तो आहे जो आपल्या प्रजेच्या योगक्षेमचा प्रचार करण्यासाठी सतत सक्रिय असतो, हिंदू धर्मानुसार, योगक्षेम हा शब्द योगाचा (यशस्वी ध्येय आणि सामर्थ्यपूर्ण कृपेचा लाभ) आनंद देणारा आहे.

**निष्कर्ष :**

बहुतांशी राजेशाही गृहीत धरणारा हा ग्रंथ सध्याच्या लोकशाहीच्या दिवसांत कालबाह्य वाटण्यासारखा आहे. परंतु यातील विचारांनी पुष्कळशी शिकवण थोड्याफार फरकाने आजही उपयुक्त ठरेल यात शंका नाही. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील या तत्वामुळे शासनाची संकल्पना भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये मोलाची आहे या तत्त्वांचे पालन केल्यास अधिक प्रभावी न्याय्य व प्रजाभिमुख होते त्यामुळे समाजात समृद्धी आणि स्थिरता येते. अर्थशास्त्राने शासकाच्या कर्तव्यांचे वर्णन केले आहे, ज्यात प्रामाणिकपणा, पारदर्शकता, आणि जनतेच्या कल्याणासाठी काम करणे यावर जोर देण्यात आला आहे. आजच्या भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये हे तत्वज्ञान प्रशासनाची नैतिकता आणि नेतृत्वाच्या गुणांचे प्रतीक मानले जाते. आधुनिक काळातही कौटिल्याच्या या विचारांची महत्त्वाची भूमिका आहे, कारण ते केवळ नेतृत्वात नव्हे तर धोरणनिर्मिती, सुरक्षा, आर्थिक नियोजन आणि परराष्ट्र संबंधांसाठीहीउपयुक्त आहेत.

कौटिल्याचे सार्वजनिक प्रशासन राजेशाही राजवटीवर अवलंबून होते हे सर्वज्ञात आहे तर आधुनिक युगात भारतात संसदीय लोकशाही आहे ज्यामध्ये सदस्य लोकांद्वारे निवडले जातात. कौटिल्याच्या राज्याचा प्रमुख राजा असतो जो लोकांनी निवडलेला नसतो. राज्याच्या प्रशासनातील हा प्रमुख फरक आहे. आधुनिक युगात, प्रमुख म्हणजेच राष्ट्रपती हा निवडून आलेला प्रतिनिधी असतो. तो राजाइतका शक्तिशाली नाही कारण त्याच्याकडे आर्थिक आणि कायदेविषयक अधिकार यासारख्या काही अधिकारांचा अभाव आहे. शिवाय, गंभीर प्रकरणांमध्ये, तो दोषींना न्यायिक संस्थेद्वारे फाशी दिली जात असल्याने त्यांचा न्याय करू शकत नाही. प्रमुखांच्या अधिकारांमध्ये हा एक महत्त्वाचा बदल आहे. आधुनिक युगात सत्ता पृथक्करणाचा नियम आहे. राष्ट्रपती हा कार्यकारी असतो फक्त तिथेच जिथे न्यायिक आणि कायदेविषयक अधिकार कौटिल्य राजाच्या तुलनेत कमी असतात. जरी त्यांच्याकडे कमी असले तरी ते आजच्या

क्षेत्रासाठी आवश्यक आहे कारण मानवी हक्क त्यांच्याशी जोडलेले आहेत. राष्ट्रपती आणि मंत्रिमंडळाच्या निवडणूक प्रक्रियेत हा फरक येतो. पंतप्रधान हे आजच्या राज्याचे नाममात्र प्रमुख आहेत ज्यांच्याकडे राष्ट्रपतींच्या तुलनेत सर्वात जास्त आणि सर्वोच्च अधिकार आहेत.

खरंच, राजकीय आणि सामाजिक बदलामुळे निवडणूक प्रक्रियेत बदल झाले आहेत कारण आजचा समाज हा लोकशाही समाज आहे ज्याला सार्वभौम लोकप्रियता आहे. कल्याणकारी राज्याची मुळे प्राचीन समाजात आहेत परंतु लोकांच्या गरजांनुसारते काही प्रमाणात बदलले आहे. मंत्रिमंडळाची राज्यातील जनतेप्रती भूमिका आणि कर्तव्ये समान आहेत. शिक्षेच्या बाबतीत फरक फक्त इतकाच आहे की कौटिल्य ज्या क्रूरतेची व्याख्या करतात ती आधुनिक युगात शक्य नाही. त्याचे कारण म्हणजे अविभाज्य मानवी हक्क. विचारवंताने परिभाषित केलेली शिक्षा खूपच कठोर आणि क्रूर आहे परंतु ती त्या काळासाठी आवश्यक असू शकते आणि काही विशिष्ट परिस्थितींनंतर, आज मानवी हक्कांना प्राधान्य दिले जाते जे आजच्या प्रशासकांसाठी योग्य विचारात घेतले जाऊ शकत नाही.

**संदर्भ सूची :**

1) आर्थिक विचारगाथा - डॉ. श्री. प्र. कुलकर्णी (साईनाथ प्रकाशन)

2) आर्थिक विचार व विचारवंत - डॉ. बी. डी. कुलकर्णी, डॉ. एस. व्ही. ढमढेरे (डायमंड प्रकाशन)

3) आर्थिक विचारांचा इतिहास - कै. डॉ. स. श्री. मु. देसाई, डॉ. सौ. निर्मल भालेराव (निराली प्रकाशन)

4) कौटिलीय अर्थशास्त्र - प्रा. र. पं. कंगले (महाराष्ट्र राज्य साहित्य)

5) कौटिल्य अर्थशास्त्र - अनिलकुमार मिश्र (प्रभात प्रकाशन)

6) eGyankosh (https://egyankosh.ac.in)